मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहिराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# 200 कोटींचा महसूल महापालिका तिजोरीत जमा

## दहा ते वीस टक्के सवलत, कर सवलतीच्या योजनांचा लाभ घ्या : आयुक्त शेखर सिंह यांचे आवाहन




**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीत महिलांच्या नावाने असलेल्या निवासी मिळकतींवर सामान्य करात 30 टक्के, दिव्यांगाना 50 टक्के सवलत देण्यात येणार आहे. माजी सैनिकांना 100 टक्के सवलत लागू आहे. यापूर्वी लाभ घेतलेल्या महिला, दिव्यांग आणि माजी सैनिकांना नव्याने अर्ज करण्याची गरज नाही. तसेच 2024-25 या आर्थिक वर्षाच्या अवघ्या दीड महिन्यात 25 टक्के मालमत्ता धारकांनी दोनशे कोटी रूपयांचा कर महापालिका तिजोरीत जमा केला आहे. त्यामुळे नागरिकांनी 30 जूनपर्यंत विविध मालमत्ता कर सवलतीच्या लाभ घ्यावा, असे आवाहन आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांनी केले आहे.

शहरात निवासी, व्यावसायिक, औद्योगिक, मोकळ्या जमीन, मिश्र अशा सहा लाख 28 हजार मालमत्ता आहेत. नागरिकांना मालमत्ता कराचा घरबसल्या भरणा करता यावा, यासह सर्व सेवा सुविधा ऑनलाइन उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. 30 जूनपर्यंत कराचा भरणा करणाऱ्या नागरिकांसाठी विविध सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. गतवर्षाप्रमाणे यंदाही महापालिकेने महिला बचत गटामार्फत बिलांचे वेळेत वाटप केले आहे. मालमत्ताधारकांना बिल मिळताच कर भरण्यास ते प्राधान्य देत आहेत. त्यामुळेच अवघ्या दीड महिन्यात 1 लाख 81 हजार 968 मालमत्ता धारकांनी तब्बल दोनशे कोटी 39 लाख रूपयांचा कर भरणा केला आहे.

पर्यावरण पूरक हौसिंग सोसायट्यांनी सवलतींचा लाभासाठी त्वरित अर्ज करावेत

शहरातील पर्यावरण पूरक हौसिंग सोसायट्यांनी सवलतीचा लाभ घेण्यासाठी लवकर अर्ज करावेत. जेणेकरून अशा सोसायट्यांना आगाऊ कर भरण्याचा आणि पर्यावरण पूरक सवलतीचा एकत्र लाभ घेता येईल.

> “2024-25 या आर्थिक वर्षात 25 टक्के मालमत्ता धारकांनी तब्बल दोनशे कोटी रूपयांचा कर भरणा केला आहे. तसेच मालमत्ता धारकांनी 30 जूनपर्यंत संपूर्ण कराचा भरणा केल्यास किमान दहा टक्के व कमाल 20 टक्के सवलत देण्यात येत आहे. या सवलतींचा मालमत्ता धारकांनी लाभ घ्यावा. त्यानंतर लागणारे महिना दोन टक्के विलंब शुल्क टाळण्यासाठी नागरिकांनी आगाऊ कराचा भरणा करून महापालिकेला सहकार्य करावे.
>
> **- शेखर सिंह, आयुक्त तथा प्रशासक, पिंपरी-चिंचवड महापालिका.**

**असा आला कर..**

आँनलाइन – 132 कोटी 92 लाख
रोख – 12 कोटी 14 लाख 64 हजार
धनादेश – 8 कोटी 6 लाख 51 हजार
आरटीजीएस – 1 कोटी 22 लाख 44 हजार
डीडी – 49 लाख 30 हजार
एनएफटी – 4 कोटी 39 लाख 20 हजार
विविध अँप – 4 कोटी 92 लाख 52 हजार

> “गतवर्षी 2023-24 च्या पहिल्या तिमाहीत पन्नास टक्क्यांपेक्षा अधिक मालमत्ता धारकांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत तब्बल 447 कोटी रुपयांचा कर भरणा केला होता. यंदाही दीड महिन्यात 1 लाख 81 हजार 968 जणांनी विविध कर सवलतींचा लाभ घेत कर भरला आहे.
>
> **- नीलेश देशमुख, सहाय्यक आयुक्त, कर आकारणी व कर संकलन विभाग.**

---

# अनधिकृत होर्डिंगवर महापालिकेचा हातोडा

## शहरातील 24 अनधिकृत होर्डिंग्जधारकांवर होणार गुन्हा दाखल : अनधिकृत होर्डिंग काढून घेण्याच्या सूचना



**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेची परवानगी न घेता अनधिकृत होर्डिंग, जाहिरातफलक उभारण्यात आले आहेत. त्या होर्डिंग्जधारकांची शुक्रवारी (१७ मे) बैठक घेत अनधिकृत होर्डिंग काढून घेण्याच्या सूचना होर्डिंग मालकांना केल्या होत्या. मात्र, अनधिकृत होर्डिंगवर काढून न घेतल्याने सोमवारी अनधिकृत होर्डिंगवर कारवाईला महापालिकेने सुरुवात केली आहे. त्यानुसार ‘ई’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत मोशी भागात सायंकाळी पाचपर्यंत पाच मोठे होर्डिंग हटवण्यात आले आहेत.

मुंबईतील घाटकोपर येथे होर्डिंग कोसळून झालेल्या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला. त्यानंतर राज्यात अनधिकृत होर्डिंगचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. ही घटना ताजी असतानाच पिंपरी-चिंचवड शहरातील मोशी येथे देखील होर्डिंग कोसळल्याची घटना घडली. मात्र, यामध्ये कोणतीही जीवितहानी झाली नाही. या घटनेनंतर महापालिका प्रशासनाने अनधिकृत धोकादायक होर्डिंगवरील कारवाईची गती वाढवली. महापालिकेच्या वतीने सर्वेक्षण करण्यात आले होते. यात शहरात अनधिकृत २४ होर्डिंग्ज सापडले होते. त्यांना नोटीस देत निष्कासित करण्याची कारवाई करण्यात येत आहे. तसेच अधिकृत जाहिरातफलक किंवा होर्डिंग लावताना फलकाच्या शेवटी नागरिकांसाठी सूचना लिहिणे गरजेचे आहे. या सूचनांचा नमुना महापालिकेच्या आकाशचिन्ह परवाना विभागाच्या वतीने फलकधारकांना देण्यात येईल.

होर्डिंगच्या खाली टपरी, दुकान किंवा अतिक्रमण केले गेले तर त्याबाबत फलकधारक किंवा जागा मालकांनी महापालिकेस कळवणे आवश्यक आहे. महापालिका संबंधित दुकान, टपरी किंवा अतिक्रमणावर निष्कासनाची कारवाई करण्यास सुरुवात केली आहे. दरम्यान, महापालिकेच्या ‘ई’ क्षेत्रीय कार्यालयांतर्गत येणाऱ्या मोशी परिसरात कारवाईला सुरुवात करण्यात आली.

**होर्डिंगधारकांना हे बंधनकारक..**

**» शहरातील सर्व जाहिरात फलकधारकांनी परवाना दरवर्षी नूतनीकरण करणे आवश्यक आहे. दरवर्षी ३१ मार्चपर्यंत विहित वेळेत फलकधारकांनी परवान्याचे नूतनीकरण केले नसेल तर त्यांच्या परवान्याचे नूतनीकरण केले जाणार नाही. तसेच प्रत्येक फलकधारकाने संरचनात्मक लेखापरीक्षण प्रमाणपत्र (स्ट्रक्चरल ऑडिट सर्टिफिकेट) सादर करणे बंधनकारक आहे. जे फलकधारक प्रमाणपत्र सादर करणार नाहीत त्यांचा परवाना रद्द केला जाणार आहे. तसेच फलक उभारण्यात आलेल्या जागेवर संरचना अभियंत्याने पाहणी करून संरचनात्मक लेखापरीक्षण प्रमाणपत्र द्यावे. जाहिरात फलकाची संरचना गंजू नये किंवा कमकुवत होऊ नये यासाठी संरचना पेंटिंग करणे बंधनकारक असणार आहे.**

# मद्यधुंदांच्या राहण्याची व्यवस्था पबमध्ये करा

## न्यायालयाने सुनावले : ‘ब्लॅक’ तसेच ‘कोझी’ पबच्या मालकासह व्यवस्थापकाला पोलीस कोठडी

**पुणे | प्रतिनिधी**

भरधाव महागडी कार चालवत दुचाकीला दिलेल्या धडकेत तरुण आणि तरुणीच्या मृत्यूप्रकरणात पोलिसांनी कोझी आणि ब्लॅक पब येथील सीसीटीव्ही फुटेज जप्त केले आहे. जप्त करण्यात आलेले फुटेज व आरोपींकडून तपासादरम्यान देण्यात आलेली माहिती यामध्ये मोठी तफावत असल्याची माहिती पोलिसांनी न्यायालयात दिली. यावरून विशेष न्यायाधीश एस. पी. पोंक्षे यांनी पबचालकांना चांगलेच फटकारले. गरज पडल्यास मद्यधुंदांच्या राहण्याची व्यवस्था मालकांनी पबमध्ये करावी, असे त्यांनी सुनावले.

विशेष न्यायाधीश एस. पी. पोंक्षे म्हणाल्या, “पब चालवणे म्हणजे मजा नाही. मद्यपान करणारे ग्राहक सुरक्षितपणे घरी पोहोचतील याची खात्री करणे ही पबमालकांची जबाबदारी आहे. मद्यधुंद व्यक्तींवर लक्ष ठेवण्यासाठी गेटच्या बाहेर एक व्यक्ती तैनात करायला हवी. मद्यधुंदांना गाडी चालवून देऊ नका. गरज पडल्यास त्यांची राहण्याची व्यवस्था तेथेच करा.”



ब्लॅकमधील कामगारांनी अल्पवयीन मुलांना टेबलवर मद्य पुरविल्याचेही पोलीस तपासातून पुढे आले आहे. बेदरकारपणे कार चालविणाऱ्या मुलासह इतर अल्पवयीन मुलांना पबमध्ये मद्य पुरविल्याप्रकरणी दोन्ही पब मालकांसह व्यवस्थापकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यातील तिघांना मंगळवारी (दि. २१) अटक करण्यात आली.

कोझी पबचे मालक नमन प्रल्हाद भुतडा (वय २५, रा. ए ७, पद्म विलास एन्क्लेव्ह, वानवडी), व्यवस्थापक सचिन अशोक काटकर (वय ३५, रा. साईसदन ए २, तुकाईदर्शन, हडपसर) आणि ब्लॅक पबचे मालक संदीप रमेश सांगळे (वय ३५, रा. ऑस्कर शाळेसमोर, फ्लॅट नं. १०७, पद्मावती हाईट्स, केशवनगर, मुंढवा) असे अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. आरोपींना अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस. पी. पोंक्षे यांच्या न्यायालयात हजर करण्यात आले होते. गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करण्यासाठी आरोपींना सात दिवसांची पोलीस कोठडी देण्याची मागणी सरकार पक्षाकडून करण्यात आली.

‘ब्लॅक’ पबमधील कामगारांनी अल्पवयीन मुलांना टेबलवर मद्य पुरविल्याचे पोलीस तपासात सांगितले आहे. पोलिसांकडे प्राप्त झालेल्या सीसीटीव्ही फुटेजवरून आरोपींनी त्यांच्या पबमध्ये अल्पवयीन मुलगा व त्याच्या मित्रांच्या वयाची खात्री करता मद्य पुरविल्याचे दिसते. तसेच हॉटेलमध्ये दर्शनी भागावर कोठेही बाल न्याय अधिनियम कलम ७७ प्रमाणे नोटीस किंवा सूचना लावलेली नसल्याने आरोपींनी गुन्हा केल्याचे सिद्ध होत असल्याचे सरकारी वकील विद्या विभूते आणि योगेश कदम यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले.

अल्पवयीन मुलांना पबमध्ये दारू देणे हा अदखलपात्र गुन्हा आहे. तर मोटार वाहन कायद्यानुसार दाखल कलमांबाबतची कारवाई योग्य नाही. कारण आरोपी मोटारीचे मालक नाहीत. तसेच त्या अनुषंगाने त्यांचा गुन्ह्यात काहीच सहभाग नाही. त्यामुळे अटकेची कारवाई बेकायदेशीर आहे, असा युक्तिवाद अ‍ॅड. जैन यांनी केला.

### तिघांची 24 मेपर्यंत पोलीस कोठडीत रवानगी

» अल्पवयीन मुलगा व त्याच्या मित्रांच्या वयाची खात्री न करता त्यांना मद्य पुरविण्यात आले. याबाबत त्याकडे विचारपूस करून ते रेकॉर्ड तपासासाठी जप्त करायचे आहे. अल्पवयीन मुलाला पबमध्ये मद्य पिण्याची मुभा व परवानगी देण्यामध्ये दोन्ही पबमालकांचा काय सहभाग आहे? हॉटेलचे प्रत्यक्ष व्यवस्थापन कोण पाहते?त्यांचा गुन्ह्यात सहभाग आहे का, याविषयी अटक आरोपींकडे सखोल तपास करायचा आहे. हॉटेलचे मुख्य मालक व इतर व्यवस्थापन पाहणारे व्यवस्थापक यांचा या गुन्ह्यात सहभाग आहे का? यादृष्टीने तपास करायचा असल्याने आरोपींना पोलीस कोठडी देण्याची मागणी अ‍ॅड. विभूते व अ‍ॅड. कदम यांनी केली. न्यायालयाने ती मान्य करत न्यायालयाने आरोपींना २४ मे पर्यंत पोलीस कोठडी सुनावली. बचाव पक्षातर्फे अ‍ॅड. एस. के. जैन आणि अ‍ॅड.अमोल डांगे यांनी बाजू मांडली. या प्रकरणात हस्तक्षेप करण्याची परवानगी मिळण्याचा अर्ज अ‍ॅड.असीम सरोदे यांनी केला होता. तो अर्ज न्यायालयाने मान्य केला.

# विनानोंदणी वाहन दिसल्यास वितरक अडचणीत येणार

## कल्याणीनगरमधील अपघातातील पोर्श मोटार विनानोंदणी रस्त्यावर धावत असल्याची बाब उघड

**पुणे | प्रतिनिधी**

कल्याणीनगरमधील अपघातातील पोर्श मोटार विनानोंदणी रस्त्यावर धावत असल्याची बाब उघड झाली आहे. यानंतर प्रादेशिक परिवहन कार्यालयाने (आरटीओ) विनानोंदणी रस्त्यावर धावत असलेल्या वाहनांवर कारवाई सुरू केली आहे. अशी वाहने आढळल्यास त्याची विक्री करणाऱ्या वितरकाचा व्यवसाय परवाना निलंबित करण्याचे पाऊल आरटीओने उचलले आहे.

कल्याणीनगरमधील अपघातातील पोर्श मोटारीची नोंदणी प्रक्रिया पूर्ण झालेली नव्हती. यामुळे अनेक प्रश्न उपस्थित होत आहेत. आरटीओतील वाहननोंदणीच्या प्रक्रियेबाबतही शंका उपस्थित केल्या जात आहेत. या पार्श्वभूमीवर आरटीओने शहरातील रस्त्यांवर धावणाऱ्या विनानोंदणी वाहनांवर कारवाई करण्याची मोहीम हाती घेतली आहे.




आरटीओच्या भरारी पथकांकडून ही कारवाई सुरू करण्यात आली आहे.

शहरातील रस्त्यावर विनानोंदणी वाहन दिसल्यास कारवाई केली जात आहे. ही कारवाई वाहनाची विक्री करणाऱ्या वितरकावर केली जात आहे. वितरकांना याबाबत आरटीओने सूचनाही दिल्या आहेत. वितरकाने विनानोंदणी वाहन ग्राहकाला देऊ नये, असेही बजावण्यात आले आहे. विनानोंदणी वाहन दिसल्यास वितरकांना व्यवसाय परवाना निलंबित केला जाणार आहे. हा परवाना १५ दिवसांपासून ६ महिन्यांच्या कालावधीपर्यंत निलंबित केला जाणार आहे.

### विनानोंदणी वाहनांची आकडेवारीच नाही

» शहरात विनानोंदणी किती वाहने आहेत याची आकडेवारी आरटीओकडे सध्या उपलब्ध नसल्याची बाबही उघड झाली आहे. वाहनाच्या नोंदणीची जबाबदारी विक्रीवेळी वितरकावर असते. वाहन इतर राज्यांतून आणले असल्यास तेथील वितरक तात्पुरती नोंदणी करून वाहन पाठवतो. त्यानंतर संबंधित आरटीओत नोंदणी करण्याची जबाबदारी वाहनमालकाची असते. शहरात अशा प्रकारे नोंदणी प्रक्रिया पूर्ण न झालेली किती वाहने धावत आहेत, याची माहिती आरटीओकडेही नाही.

“ शहरातील वितरकांना विनानोंदणी वाहन ग्राहकांना देऊ नये, अशा सूचना करण्यात आल्या आहेत. तरीही विनानोंदणी वाहन रस्त्यावर दिसल्यास संबंधित वितरकाचा परवाना निलंबित केला जाणार आहे.

**- संजीव भोर, प्रभारी प्रादेशिक परिवहन अधिकारी.**

# मावळमध्ये निकालापूर्वीच वादाची ठिणगी

## खासदार श्रीरंग बारणेंचा अजितदादांच्या राष्ट्रवादीवर आरोप, कार्यकर्त्यांनी महायुतीचा धर्म पाळला नाही

**पिंपरी | प्रतिनिधी**

मावळ लोकसभा मतदारसंघात उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या काही कार्यकर्त्यांनी महायुतीचा धर्म पाळला नाही. ताकदीने काम केले नसल्याचा आरोप महायुतीचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांनी केला. ज्यांनी काम केले नाही, त्यांची नावे पवार यांच्याकडे दिल्याचेही त्यांनी सांगितले. त्यामुळे निकालापूर्वीच मावळात महायुतीत वादाची ठिणगी पडली.

महायुतीचे उमेदवार बारणे आणि महाविकास आघाडीचे उमेदवार संजोग वाघेरे यांच्यात चुरशीची लढत झाली आहे. त्यामुळे मावळच्या निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. वाघेरे हे पूर्वी राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये होते. जुन्या सहका-यांनी त्यांचे काम केल्याचे बोलले जात होते. त्यातच महायुतीचे उमेदवार बारणे यांनीच राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी काम केले नसल्याचा आरोप केला आहे. त्यामुळे राष्ट्रवादीच्या काही कार्यकर्त्यांनी वाघेरे यांचे काम केले असल्याच्या दाव्यावर एकप्रकारे शिक्कामोर्तब झाले.

बारणे म्हणाले की, मावळमध्ये महायुतीची ताकद होती, आहे आणि राहील. उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेची मावळात कोठेही ताकद नाही. शेकापची उरण, पनवेलला ताकद आहे. महायुतीच्या सर्व आमदारांनी काम केले. अजित पवार यांनी मावळमधील राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांना स्पष्ट सूचना दिल्या होत्या. त्यांच्या आमदारांनी आणि पदाधिकाऱ्यांनी काम केले. पण, काही कार्यकर्त्यांनी महायुतीचा धर्म पाळला नाही. नेत्यांचे आदेश मानले नाहीत. ज्यांनी काम केले नाही, त्यांची यादी पवार यांना दिली आहे. तसेच दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप, पार्थ पवार यांनीही निवडणुकीत व्यक्तिगत आरोप केले नव्हते. पण, विकासात्मकदृष्टी नसल्याने वाघेरे यांनी व्यक्तिगत आरोप केले. दरम्यान, दोन लाख ५० हजार ३७४ मतांनी विजयी होईल, असा दावाही बारणे यांनी केला. तर, वाघेरे यांनी एक लाख ७२ हजार ७०४ मतांनी विजयाचा दावा केला आहे.

महायुतीच्या सर्व नेत्यांनी आणि आमदारांनी चांगलं काम केलं. त्यामुळं माझा विजय निश्चित होईल, असं ही बारणे यांनी म्हटलं आहे. मी अडीच लाखांचा मताधिक्याने निवडून येईल. असा दावा महायुतीचे उमेदवार श्रीरंग बारणे यांनी केला आहे. पुढे ते म्हणाले, अजित पवार आणि पार्थ पवार यांनी माझं चांगलं काम केलं. कार्यकर्त्यांना त्यांनी तशा सुचना केल्या. परंतु, पहिल्यापासून खालचा कार्यकर्ता नाराज होता. ती नाराजी शेवटपर्यंत राहिली. काही कार्यकर्त्यांनी चुकीच्या पद्धतीने काम केलं. पुढे ते म्हणाले, नेत्यांनी, आमदारांनी चांगलं काम केलं आहे. जे काम करत नव्हते त्यासंबंधी मी अजित पवारांशी बोललो होतो. त्यांना त्यासंबंधी सांगितलं होतं. अस ही बारणे म्हणाले.



### ...तर आढळरावांना धनुष्यबाणाची उमेदवारी मिळाली असती

» शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश करुन निवडणूक लढविलेले शिरुरचे उमेदवार शिवाजीराव आढळराव-पाटील यांनी थोडे थांबायला हवे होते. ते थोडे थांबले असते तर त्यांना धनुष्यबाणाची उमेदवारी मिळाली असती, असा दावाही खासदार बारणे यांनी केला.

### बारणे यांनी व्यक्त केली खदखद

» अजित पवार आणि पार्थ पवार यांनी माझं काम केलं. तश्या सूचना त्यांनी खालच्या कार्यकर्त्यांना केल्या, पण त्यांनी माझं काम केलं नाही. त्यांच्यात नाराजी होती, ती शेवटपर्यंत राहिली. त्यांनी चुकीच्या पद्धतीने काम केल. अशी खदखद बारणे यांनी बोलून दाखवली आहे. बारणे हे पिंपरी- चिंचवडमध्ये प्रसारमाध्यमांशी बोलत होते.

# 'रेड झोन' मोजणीला संरक्षण विभागाचा 'ग्रीन सिग्नल'

## सिटीसर्वे आणि भूमी अभिलेख विभागाला पत्र : मे महिन्याच्या अखेर कामाला होणार सुरुवात

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवडमधील बहुप्रतिक्षित 'रेड झोन'च्या मोजणीप्रक्रियाला अखेर गती मिळाली असून, संरक्षण विभागाच्या गोला बारूद निर्माणी, खडकी प्रशासनाने रेड झोन सर्वेक्षणाला 'ग्रीन सिग्नल' दिला आहे.

भारतीय संरक्षण विभागाच्या देहू ॲम्युनेशन डेपो व दिघी मॅगझिन डेपो या भागातील 'रेडझोन' चे मा र्किंग झालेले नाही. त्यामुळे रेड झोनची मोजणी करुन नकाशा प्रसिद्ध करण्यासाठी प्रशासनाने कार्यवाही करावी. यासाठी भाजपा आमदार महेश लांडगे यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे.

शहरात दिघी, भोसरी, वडमुखवाडी, तळवडे, चिखली, निगडी, रावेत, किवळे भागात रेडझोन क्षेत्र आहे. तसेच, सांगवी, पिंपळे गुरव, पिंपळे निलख, पिंपरीगाव, कासारवाडी, दापोडी या भागांना लागूनही लष्करी आस्थापना आहेत. मात्र, देहूरोड दारूगोळा कारखाना आणि दिघी मॅगझीन डेपोमुळे रेडझोन क्षेत्र जाहीर केले आहे. त्याच्या हद्दीत बांधकामे करता येत नाही. त्यामुळे रेडझोन हद्दीच्या मोजणीची मागणी केली जात होती. ही प्रक्रिया आता दृष्टिक्षेपात आली आहे. दि. 24 मे रोजी दिघी आणि दि. 28 मे रोजी देहूरोड येथील मोजणी होणार आहे.

भारतीय संरक्षण अधिनियम, 1903 अंतर्गत देहू रोड आणि दिघी भागात दोन रेड झोन आहेत. तथापि, या रेड झोनमधील निवासी आणि व्यावसायिक मालमत्तांचे अचूक सीमांकन किंवा संख्या स्थानिक प्रशासनाकडे नाही. संरक्षण अधिकाऱ्यांनी देहू रोड दारूगोळा डेपोपासून 2000 यार्डांच्या परिघात बांधकाम करण्यास मनाई केली आहे. या रेड झोन क्षेत्रात गेल्या 30 ते 40 वर्षांपासून 3000 हून अधिक औद्योगिक आस्थापना कार्यरत आहेत आणि या युनिट्समध्ये 1 लाखाहून अधिक लोक काम करतात. त्याचप्रमाणे पिंपरी-चिंचवडमधील चऱ्होली, डुडुळगाव, दिघी, भोसरी आणि इतर भागात बाधित झालेल्या दिघी मॅगझिन डेपोपासून 1,145 मीटरच्या परिघात बांधकाम करण्यास मनाई आहे. शहरातील किमान 5 लाख नागरिक रेड झोन मुळे प्रभावित आहेत.



> केंद्र सरकार व संरक्षण विभागाशी संबंधित 2002 पासून प्रलंबित असलेला 'रेडझोन' चा प्रश्न मार्गी लावण्याबाबत 2014 पासून आम्ही सातत्याने पाठपुरावा करीत आहोत. देहूरोड आणि दिघी मॅगझीन डेपो परिसरात 'रेड झोन'मुळे बाधित होणाऱ्या हद्दीची मोजणी करावी यासाठी पाठपुरावा करीत होतो. यासंदर्भात अनेकदा जिल्हाधिकारी प्रशासनासोबत समन्वय केला. त्याला यश मिळाले असून, संरक्षण विभागाच्या 'एनओसी' ने जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणात महापालिकेच्या पथकाच्या माध्यमातून मोजणी होईल. त्यामुळे 'रेड झोन' ची हद्द निश्चित होणार आहे. यमुनानगर, रुपीनगर, त्रिवेणीनगर, निगडी आणि तळवडे यासह दिघी, भोसरी आणि चऱ्होली येथील रेड झोन बाधित मिळकती निश्चित होणार आहेत..
>
> **- महेश लांडगे, आमदार भोसरी विधानसभा, भाजपा.**

# उदासीन शासन, अकार्यक्षम लोकप्रतिनिधी

## राजगुरूनगरातील पाणीयोजना पाच वर्षांनंतरही मार्गी लागेना पाणीयोजनेचे होते भांडवल

**पुणे | प्रतिनिधी**

खेड तालुक्यात 100 पेक्षा अधिक गावांत जलजीवन पाणी योजना राबवल्या. अनेक अडचणी असताना गावागावांतील सुमारे 300 कोटी रुपयांचा निधी आला पैकी वर्षभरात 70 गावांत जलजीवन मिशनच्या पाणी योजना सुरू झाल्या काही प्रगतीपथावर आहेत असे असताना तालुक्याची राजधानी असलेल्या राजगुरूनगर शहराची पाणी योजना मात्र अडकून पडली आहे. उदासीन शासन, अकार्यक्षम लोकप्रतिनिधी आणि त्यांचे बाहुले बनलेले अधिकारी त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांना चासकमान धरणातून होणाऱ्या योजनेचे स्वच्छ मुबलक मिळत नाही, अशी संतप्त प्रतिक्रिया राजगुरूनगरवसईय देत आहेत.

खेड तालुक्याची राजधानी असलेल्या राजगुरुनगर शहराला चास कमान धरणाततून पाणी पुरवठा करणारी योजनेचे पाणी नागरिकांना कधी मिळणार की नाही, अजून किती दिवस दूषित पाणी नशिबी असणार, असा खडा सवाल शहरातील नागरिक करीत आहेत तर ही योजना अधिकाऱ्यांचा नाकर्तेपणा आणि राजकीय नेत्यांची श्रेय वादाच्या लढाईत अडकून पडली आहे. वर्षामागून वर्षे होत आहेत; मात्र राजगुरुनगर शहराला स्वच्छ मुबलक पाणी मिळत नाही.

अजूनही दुर्गंधीयुक्त आणि अस्वच्छ फिल्टर विरहित पाणी नागरिकांच्या नशिबी आहे. अनेक नागरिक या पाण्यापासून विविध आजारांनी त्रस्त आहेत. स्थानिक नागरिकांना मात्र नगरपरिषदेचे अधिकारी हुलकावण्या देत आहेत, तर राजकीय नेते आश्‍वासनांच्या फैरी झाडात आहेत. आम्ही योजना केली पाणी आम्हीच पाजणार अशी भूमिका घेणारे; मात्र जार, बिसलेरी पाणी पिऊन त्यांची तहान भागवत आहेत तर श्रेयवादात सर्वसामान्य नागरिकांचे मात्र हाल आहेत.

चासकमान धरणातून पाणी उपसा करण्यासाठी विजेची कमतरता होती त्यासाठी एक्सप्रेस फिडरची गरज होती चार ते पाच वेळा टेंडर रिकॉल झाले होते, यात मोठा कालावधी गेला. या योजनेचे काम 99 टक्के पूर्ण झाले आहे.



### निवडणूक आली की पाणीयोजनेचे होते भांडवल

» लोकसभा निवडणूक आली आणि झाली. दरम्यान, निवडणुकीपूर्वी तरी पाणी मिळेल या आशेवर शहरातील नागरिक होते; मात्र ही आशा आता मावळली असून आता विधानसभा आणि नगरपरिषदेच्या निवडणुकीकडे नागरिक डोळे लाऊन बसले आहेत. विधानसभा, नगरपरिषद निवडणूक लागल्या की राजगुरूनगरच्या पाणी योजनांचे राजकीय नेते भांडवल करून श्रेयवादाची लढाई करतील यात सर्वसामान्य नागरिकांना पुन्हा नवी आश्वासने मिळतील मात्र तसे आता होणार नाही शहरातील जनतेने खूप सोसले आहे. आता ते सोसणार नाहीत. या निवडणुकांमध्ये ज्यांनी आश्वासने दिली श्रेयवादाची लढाई केली त्यांना त्यांची जागा नक्की दाखवतील असे चित्र आहे

### केवळ 18 महिन्यांचाच कालावधी होता

» राजगुरूनगर शहराला चासकमान धरणातून पाणीपुरवठा करणारी योजना महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत दि. 29 ऑगस्ट 2018 रोजी 17 कोटी 96 लाख रुपये प्रशासकीय मान्यता मिळाली होती. एस. के. एटरप्रायझेस यांना हे काम देण्यात आले होते तर केवळ 18 महिने या योजनेचा कालावधी होता. 2 फेब्रुवारी 2019 ला या योजेनचे भूमिपूजन झाले होते. मात्र अजूनही ही योजना पूर्ण झाली नाही आणि नागरिकांना पिण्यासाठी पाणी मिळाले नाही. नगरपरिषदेचा तत्कालीन अधिकारी वर्ग याकडे फारसे लक्ष देत नाहीत. तर याचेच भांडवल मतांसाठी होईल या आशेवर पाणीयोजना मार्गी लावण्यासाठी राजकीय पातळीवर प्रयत्न केले जात नाहीत. तर अजूनही किती कालावधी उलटणार हे देवच जाणे, असे राजगुरूनगरवासीय म्हणत आहेत.

# मोरगाव परिसरात वादळी वाऱ्याने होत्याचे नव्हते

## बारामतीच्या पश्चिम भागात वादळी वाऱ्याने अनेकांची नवीन घरे व गोठांचे छप्पर उडाले

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती तालुक्याच्या पश्‍चिम भागात सोमवारी (दि. 20) रात्री झालेल्या पावसाने हाहाकार उडवला आहे. अनेकांची नवीन घरे व गोठांचे छप्पर हे वादळी वाऱ्याने उडून गेले आहेत. वादळी वारे व पावसामुळे मोरगाव परिसरातील ग्रामस्थांचे लाखो रुपयांची नुकसान झालेले आहे.

एकीकडे या भागातील जनता पिण्याचे पाण्यासाठी व्याकुळ असताना त्यातच एक नवे अस्मानी संकट शेतकऱ्यांवर उभे राहिले आहे. जनावरांच्या चाऱ्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

सोमवारी झालेल्या पावसाने या परिसरातील शेतकऱ्यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले आहे. लोणी भापकर येथे 8 दिवसांपूर्वी झालेल्या वाऱ्यामुळे अशोक बाजीराव गोलांडे यांच घराचा पत्रा तर पांडुरंग संभाजी बनकर यांच्या हॉटेलचा पत्रा उडून गेला आहे.

या वादळी वाऱ्याने झालेल्या नुकसानीमुळे येथील बळीराजाने टाहो फोडला आहे. तालुक्याच्या पश्चिम भागात सोमवारी झालेल्या वादळी वाऱ्याने लाखो रुपयांचे नुकसान झाले असल्याने या शेतकऱ्यांचे पंचनामे नोंदवून तात्काळ नुकसान भरपाई देण्याचे मागणी या परिसरातील शेतकऱ्यांनी व ग्रामस्थांनी केली आहे.

पूर्व हवेलीत जोरदार वा-यासह अवकाळी पावसाने मागील दोन दिवसांपासून जोरदार हजेरी लावली आहे. या वादळी वाऱ्यामुळे व अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. या पावसामुळे शेतकरीच नव्हे तर व्यावसायिक व सर्वसामान्य नागरिक यांचे देखील प्रचंड प्रमाणात नुकसान झाले आहे.

आळंदी म्हातोबा येथे आठ एकर क्षेत्रात पोपट गोते यांची फुल नर्सरी असून याठिकाणी त्यांनी सन्मित्र बँकमधून 95 लाखांचे आर्थिक सहाय्य घेऊन रोपांसाठी अत्याधुनिक पॉली हाऊस बांधले होत; परंतु कालच्या जोरदार पावसाने व वाऱ्याने या पॉलीहाऊसचे न भरून येणारे नुकसान झाले आहे. पुढील आठवड्यात मार्केटमध्ये येणाऱ्या रोपांचे मोठे नुकसान झाले आहे. नर्सरित विविध विदेशी प्रकारांची फुल रोपे तयार केली जातात.

आळंदी म्हातोबा येथे एकूण 34 विजेचे खांब तुटून नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी शेतातील पिके भुईसपाट झालेली आहेत. पपईच्या बागांचे मोठे नुकसान झालेले आहे.



### दुष्काळात तेरावा म्हणण्याची वेळ

» बारामती तालुक्याच्या पश्‍चिम भागातील मोरगाव, तरडोली, लोणी भापकर, पळशी, मासाळवाडी या परिसरामध्ये सोसायटीच्या वाऱ्यासह वादळी पाऊस पडला. या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पावसाचे प्रमाण कमी असले तरी वाऱ्याचे प्रमाण अधिक असल्याने तरडोली येथील पुष्पा सदाशिव माने, मीनाक्षी सदाशिव माने यांच्या घरावरील पत्रे व काही शेतकऱ्यांच्या जनावरांच्या गोठ्याचे पत्रे उडून गेल्याने लोकांना दुष्काळात तेरावा म्हणण्याची वेळ आलेले आहे.